**किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२६**
**कलम वानखडे - विरुद्ध – निरंक**
**नि. ९ खाली**

**<u>अर्जदारातर्फे अर्जदार क्र. २ यांचा सरतपास वकील श्री. यु. एल. अथाटे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>**

मी शपथेवर खरे सांगते की, माझे शपथपत्र नि.क्र. ९ मधील मजकुर माझे विधीज्ञांनी माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखीत केला असुन, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. माझे पती नामे **राहुल मोहनराव वानखडे** हे कायमस्वरूपी लोणी टाकळी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील रहिवाशी होते. त्यांचा मृत्यु दि. २७.१०.२०२५ रोजी रस्ते अपघातात झालेला आहे.

१. आता मला माझे पतीचे नामे **राहुल मोहनराव वानखडे** यांचा मुळ मृत्युचा दाखला दाखविण्यात आला, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि. क्र. १०** देण्यात येतो.

२. आता मला माझे पतीचे पडताळणी केलेले आधारकार्ड दाखविण्यात आले, ते तेच असुन त्यास **नि. क्र. ११ ते १४** देण्यात येते.

३. आता मला सर्व अर्जदार यांचे पडताळणी केलेले आधारकार्ड दाखविण्यात आले, ते तेच असुन त्यास **नि. क्र. १२ ते १४** देण्यात येते.

४. आता मला दि. **०७.०२.२०२६** रोजीचा **दैनिक बातमीपत्र** वर्तमानपत्रातील जाहिरनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि. क्र. १५** देण्यात येतो.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास गैरअर्जदारातर्फे कोणीही नाही.</u>**

दिनांक :- २८.०४.२०२६

सा.वा.दा.ब.अ.क.केले

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2026.04.28 16:46:52 +0530

**(छाया शा. मेहरे)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
नांदगाव खंडेश्वर

श्रवणोत्तर स्विकृत / समक्ष

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2026.04.28 16:46:55 +0530

**(छाया शा. मेहरे)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
नांदगाव खंडेश्वर